तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची
<u>बदलीने पदस्थापना</u>
**श्री. इरेश चप्पलवार, तहसिलदार**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन आदेश क्र.बदली-२०२६/प्र.क्र.१४५/आस्था-०३
(ई-ऑफिस क्र.१६२०९०१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ११ जून, २०२६

**संदर्भ**:- १. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
२. महसूल व वन विभाग, शासन आदेश, क्र. बदली-२०२६/प्र.क्र. ८२ (२)/आस्था-०३, दिनांक २४.०३.२०२६.
३. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथील मुळ अर्ज क्र. २७५/२०२६ मध्ये दिनांक २५.०३.२०२६ रोजी पारित केलेले आदेश.
४.अवर सचिव तथा उप मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. ईएलआर-२०२६/प्रक्र. ७२/२६/नि-६, दिनांक ११.०६.२०२६.

**शासन आदेश:-**

संदर्भ क्र. २ येथील आदेशान्वये, श्रीमती संघमित्रा बाविस्कर, तहसिलदार (निवडणुक),जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर यांची तहसिलदार, बोरीवली, मुंबई उपनगर या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली होती.

२. परंतु, सदर पदावर कार्यरत असलेले श्री. इरेश चप्पलवार, तहसिलदार यांनी सदर दिनांक २४.०३.२०२६ रोजीचे आदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. २७५/२०२६ अन्वये आव्हानित केले होते. सदर मुळ अर्जाच्या अनुषंगाने मा. न्यायाधिकरणाने दिनांक २५.०३.२०२६ रोजीच्या सुनावणीअंती पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

> 9. The above mentioned facts & circumstances must therefore result in observing that 'Balance of Convenance' at this stage lies in favour of Applicant and consequently it is directed that the Applicant should continued on post of Tahsildar. Borivali Mumbai Suburban District' and Respondent No.4 on the post of Tahsildar (Election)' in Office of 'District Collecter. Mumbai Suburban District' till completion of Normal Tenure of '3 Years' of Applicant on 12.06.2026. In the meanwhile; the 'Revenue and Forest Department' as 'Cadre Controlling Authority of Tahsildar' would be at liberty to decide assignment of suitable post to Applicant from 12.06.2026
>
> 10. The implementation of 'Government Order' dated 24.03.2026 of Respondent No.4 to post of Tahsildar. Borivali Mumbai Suburban District' will thus stand

deferred but shall invariably be brought effect on 12.06.2025 when Respondent No.4 shall be relieved from post of Tahsildar (Election)' in Office of 'District Collecter, Mumbai Suburban District' to join on post of Tahsildar, Borivali Mumbai Suburban District.

३. मा. न्यायाधिकरणाने दिनांक २५.०३.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्री. इरेश चप्पलवार, तहसिलदार यांचा तहसिलदार बोरीवली, जि.मुंबई उपनगर या पदावरील ३ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत म्हणजेच दि.१२.०६.२०२६ पर्यंत त्यांना त्याच पदावर ठेवण्यात यावे. तसेच, श्रीमती संघमित्रा बाविस्कर, तहसिलदार यांनी त्यांच्या पूर्वीच्या तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय. मुंबई उपनगर या ठिकाणी पुन्हा रूजू व्हावे, असा निर्णय घेण्यात आला आहे.

४. आता, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार खाली नमूद केलेल्या तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | **श्री.इरेश चप्पलवार, तहसिलदार** | **तहसिलदार बोरीवली, जि.मुंबई उपनगर** | **तहसिलदार (निवडणूक), जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर येथे श्रीमती संघमित्रा बाविस्कर यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर** |

५. मा. न्यायाधिकरणाचे दिनांक २५.०३.२०२६ रोजीचे आदेश विचारात घेता, श्री. इरेश चप्पलवार, तहसिलदार यांना सध्याच्या कार्यरत पदावरून दिनांक १२.०६.२०२६ (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. तदनंतर, श्री.इरेश चप्पलवार, तहसिलदार यांनी त्यांना देण्यात आलेल्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रूजू व्हावे.

६. सदर आदेश संदर्भ क्र. ४ येथील अवर सचिव तथा उप मुख्य निवडणुक अधिकारी, मुख्य निवडणुक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा “अकार्यदिन”(dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८.	संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

९.	संबंधित अधिकारी यांनी सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

१०.	सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०६१११९४३१२९११९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH
ASHOKRAO
VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.06.11 20:13:19 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. प्रधान सचिव तथा मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, कोकण.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
- संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- उप सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
- निवडनस्ती (आस्था-३).